# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.११५३/२४/त.क्र.५८/२५/०१**

**Mr. Chirag A. Garasia**
Blow The Whistle Foundation
M-3/Room No., 1 next to Ayushakti Hospital,
B.N. Nagar Road No.2, Malad (w) Mumbai-400064

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पजवा) एफ/उत्तर विभाग**
एफ/उत्तर विभाग यांचे कार्यालय, ३ रा मजला, वरळी इंजिनिअरिंग हब,
डॉ. ई. मोझेस रोड, वरळी नाका, मुंबई-४०००१८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पजवा) शहर, परि-२**
एफ/उत्तर विभाग, परि-२ यांचे कार्यालय, ३ रा मजला, वरळी इंजिनिअरिंग हब,
डॉ. ई. मोझेस रोड, वरळी नाका, मुंबई-४०००१८

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.०९.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रार अर्जावर आज दि.१६.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्रीम. संजना चव्हाण उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पजवा) शहर एफ/उत्तर विभाग व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पजवा) शहर अनुपस्थित आहेत.

तक्रारदार यांनी असे विशद केले की, द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीत पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नाही.

या तक्रार संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारदार श्री. चिराग गरासिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम १८(१) अन्वये दाखल केलेल्या तक्रारीत अपील क्र.२५२१/२४/०१, २५२३/२४/०१, २५२४/२४/०१ दि.०१.०४.२०२४ रोजी झालेल्या सुनावणीत पारीत आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदण्यात आला असून त्यात नमूद केल्याप्रमाणे अवलोकनानंतर विनामूल्य माहिती देण्याचे निर्देश दिले असता, यात अनुपालन झाले नसल्याचे नमूद केले नाही. सादर केलेल्या दि.०३.०४.२०२४ रोजी तत्कालीन

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पजवा) एफ/उत्तर यांनी दि.१९.०४.२०२४ रोजी तक्रारदार श्री. गरासिया यांना उपरोक्त माहितीचे अवलोकन करण्याकरीता पाचारण केले असता कुठलीही माहिती त्यांनी निरीक्षणार्थ उपलब्ध करून दिली नसल्याचा आक्षेप तक्रारदार यांना दि.२९.०५.२०२४ रोजीच्या अर्जात नमूद केले असून त्यांनी त्यानंतर दि.११.११.२०२४ रोजी प्रस्तुत तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पजवा) शहर जी/दक्षिण विभाग यांनी या संदर्भात तात्काळ खुलासा सादर करावा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम १८ प्रमाणे नमुद तरतुदींप्रमाणे संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.०९.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra